

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क.













IRBK-0112954
IRBK-0112954

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे.
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

29 MAR 1977

नों. क्र. १२६५४
नों. क्र. ७६५७
३०१३१७
३६९८

माझ्या आवडत्या गोष्टी

# बंडूराजे

ना. क्र. १२९५४
दि. ७।१।९१

लेखक
मो. धों. धोपेश्वरकर, बी. ए.

IRBK-0112954
IRBK-0112954

कर्नाटक प्रकाशन संस्था
चिराबाजार, मुंबई २

किंमत ऐंशीं पैसे

## चार शब्द

मुलांना आवडतील अशा गोष्टी सांगणें व लिहिणें हा माझा एक छंद आहे. मीं लिहिलेल्या गोष्टींचीं हस्तलिखितें वाचून मुलें खूप होतात असें मला दिसून आलें. पण हस्तलिखिताचें छापील मजकुरांत रूपान्तर करण्याचें तंत्र मला फारसें अवगत नाहीं. म्हणून सुमारें पंधरा वर्षांपूर्वी मीं लिहिलेली ही 'बंडूची गोष्ट' तशीच पडून राहिली होती. तिला प्रकाशांत आणण्याचें काम माझे स्नेही व सहकारी श्री. **मोरेश्वरशास्त्री जोशी** ह्यांनीं स्वखुषीनें मनावर घेतलें, म्हणून ही गोष्ट छापून प्रसिद्ध झाल्याचें सर्व श्रेय शास्त्रीबुवांचें आहे.

**मो. धों. धोपेश्वरकर**

*इगतपुरी*
*विजयादशमी, १८९०*


© कर्नाटक प्रकाशन संस्था



पहिली आवृत्ति
दासनवमी, १८९०
११ फेब्रुवारी, १९६९

मुद्रक : व. बा. खळे
जय गुजरात प्रिंटिंग प्रेस
गांवदेवी, मुंबई ७

प्रकाशक : बा. ग. ढवळे
कर्नाटक प्रकाशन संस्था
गिरगाव, मुंबई २


## अनुक्रम



१ धाडसी प्रवास ३
२ पांचावर धारण ७
३ राजवाड्यांत चोरी १०
४ कैदेंतून सुटका १३
५ पालखींतून जा १८
६ कल्पवृक्षाची कृपा २२
७ शंकरजीची इच्छा २६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम
क्रमांक ... नोंद दि ...

## १

## धाडसी प्रवास

आजचा दिवस बंडूला विशेषच त्रासदायक गेला. सकाळीं उठल्यापासून रात्रीं अंथरुणावर पडेतोंपर्यंत कांहींही कसूर नसतांना त्याला छळ सोसावा लागला होता. आदल्या रात्रीं काकूनें विरजून शिंक्यावर ठेवलेलें दुधाचें भांडें मांजरानें उडी मारून पाडलें. पण मांजरावर रागावण्याऐवजीं काकू विचाऱ्या बंडूवरच रागावली. थोड्या वेळानंतर गोठ्यांत बांधलेल्या वासरानें आपलें दावें तोडलें व सर्वांची नजर चुकवून तें कोठेंतरी पळून गेलें. ही गोष्ट काकूला कळतांच ती विनाकारण बंडूवरच संतापली आणि वासरूं शोधून काढीपर्यंत जेवायला मिळणार नाहीं असें तिनें बंडूस बजावलें. जणूं कांहीं दावें तोडून वासरूं पळालें ही बंडूचीच चूक होती! सपाटून भूक लागली होती, तरी बंडूला मुकाट्यानें वासरूं शोधायला जाणें भाग पडलें. दोन-तीन तासांची पायपीट करून एकदाचें त्यानें वासरूं शोधून काढलें. त्यानंतर निवलेल्या अन्नाचे चार घास कसेबसे पोटांत गेले न गेले तोंच काकांच्या सेवेला त्याला हजर व्हावें लागलें. त्यांच्या लचक भरलेल्या कंबरेस मालीश करण्याचा काकूनें हुकूम सोडला. काकांच्या कंबरेला मालीश करतां करतां बंडूचा जीव मेटाकुटीस आला. काका कांहीं केल्या 'पुरे' म्हणत ना! मालीश करणाऱ्यालाही कांहीं श्रम पडतात हें त्यांच्या मनांतही येईना. त्यानंतर संध्याकाळीं काकूनें त्याला चक्कीवर दळण दळून आणण्यास पाठविलें. पण चक्की बंद होती. म्हणून तो परत आला. रात्रीच्या स्वयंपाकासाठीं घरांत बिलकुल पीठ नव्हतें. म्हणून काकू तडफडत जात्यावर बसली व जातें ओढण्यास बंडूला हातभार लावावा लागला. दळण संपेपर्यंत काकूच्या तोंडाचा तोफखानाही सारखा सुरू होता. बंडूचे कान



जातें ओढण्यास बंडूला हातभार लावावा लागला.

फुटण्याची वेळ आली, पण दळण संपेपर्यंत काकूचें वाळून-पाडून बोलणें ऐकत राहाणें त्याला भाग पडलें. सबंध दिवसभराच्या ह्या कटकटीमुळें बंडूचें बालमन खचून गेलें व तो अंथरुणावर पडला तरी त्याला लवकर झोप लागेना.

स्वस्थ झोप यावी म्हणून बंडूनें डोळे झाकले होते, पण त्याच्या डोक्यांत मात्र विचारांचा भडका उडाला होता. दिवसभर झालेल्या गोष्टींची त्यानें संतप्तपणें अनेकदा उजळणी केली आणि ह्या त्रासांतून मुटका करून घेण्यासाठीं घरांतून पळून जावें असें अखेर त्याच्या मनानें घेतलें. विचार करकरून त्याला शीण आला व अर्धवट झोप लागली. रात्रीचा पुष्कळसा वेळ स्वप्नांवर स्वप्नें पडण्यांत गेला. सावत्र आईनें अपमान केल्यामुळें नारायणाकडे दाद मागण्यासाठीं ध्रुवबाळ रानावनांत भटकत आहे, असें त्यानें पाहिलें. काकाच्या घरून

पळून गेलेल्या अल्लाउद्दिनास जादूचा दिवा सापडलेला त्यास दिसला. डिक् व्हिटिंग्टन हा घरांतून पळून गेलेला मुलगा पुढें खूप श्रीमंत होऊन लंडनचा नगराध्यक्ष झाला ह्याचेंही चित्र त्याच्या डोळ्यांसमोरून गेलें व घराबाहेर पडल्यावर आपलेंही नशीब असेंच उघडणार ह्या कल्पनेनें त्याच्या मनाला उत्तेजन मिळाल्यासारखें वाटलें.

दुसऱ्या दिवशीं बंडू भल्या पहाटेस उठला व तोंड धुणें, वगैरे करून कोणाच्याही दृष्टीस न पडतां घराबाहेर सटकला. एक ठिगळें लावलेली चड्डी व एक जुनाट कांबळें इतक्याच वस्तु त्यानें आपल्या-बरोबर घेतल्या. घर सोडल्यावर कोठें जायचें व काय करायचें ह्याचा त्यानें फारसा विचारच केला नव्हता. म्हणून पाय नेतील तिकडे तो चालूं लागला. गांवाबाहेर दोन मैलांवर एक टेकाड होतें व त्यावर महादेवाचें एक देऊळ होतें, तेथें तो येऊन पोंचला. गांव सोडून जाण्यापूर्वी देवळांतील साधुबुवांची अखेरची भेट घ्यावी, अशी त्याला इच्छा झाली. तो टेकाड चढून वर गेला व देवळांत शिरला.

देवळांतील एका कोपऱ्यांत धुनीजवळ साधुबुवा चिलीम ओढीत बसले होते. ह्या लांब पांढऱ्या दाढीच्या साधूबद्दल गांवांतील लोकांत विलक्षण कल्पना पसरलेल्या होत्या. कोणी म्हणत, कीं तो जवळच असलेल्या स्मशानांत हिंडून मेलेल्या माणसांच्या कवट्या गोळा करतो व त्यांच्या साहाय्यानें मंत्रतंत्र किंवा जादूटोणा करतो. कोणी म्हणत, कीं मध्यरात्रीनंतर स्मशानामधलीं भुतें त्याच्या सभोवतीं गोळा होतात व मशाली पेटवून त्याला नाच करून दाखवितात. त्यानें मोठी तपश्चर्या केलेली असून अनेक सिद्धि मिळविल्या आहेत, अशीही कांहींजणांची समजूत होती. आमच्या देखत साधुबुवांनीं दगडांची खडीसाखर करून मुलांस प्रसाद वांटला असें सांगणारे कित्येक लोक होते. त्यानें विस्तवांत हात घातला, तरी तो जळणार नाहीं, अशीही एक समजूत पसरलेली होती. कांहीं भाविक लोकांची अशी श्रद्धा होती, कीं साधुबुवांना प्रत्यक्ष शंकरपार्वतीचें दर्शन घडलें आहे.

साधुबुवा कसे का असेनात, गांवच्या मुलांना ते फार आवडत असत, ह्यांत शंका नाहीं. कोणतेंही मूल देवाच्या दर्शनास आलें, कीं साधुबुवा त्याला गूळ-खोबरें, खडीसाखर, मनुका किंवा पेढ्याचा तुकडा प्रसादादाखल देत व तोंड भरून आशीर्वाद देत. मुलांवर त्यांची अतिशय माया होती आणि मुलेंही त्यांच्यावर नेहमीं खूष असत. बंडू ह्यापूर्वीं अनेक वेळां येऊन साधुबुवांकडून प्रसाद व आशीर्वाद घेऊन गेलेला होता. साधुबुवांनाही त्याची चांगली तोंडओळख झाली होती. देवदर्शन घेऊन बंडू बुवांच्या जवळ जाऊन बसला. "बेटा!" अशी प्रेमळपणें हाक मारून, "इतक्या सकाळीं कां आलास?" असा बुवांनीं साहजिकपणें प्रश्न केला. पण उत्तर देण्याऐवजीं बंडू रडायलाच लागला. साधुबुवांस आश्चर्य वाटलें. त्यांनीं बंडूच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें, "तुला कोणतं दुःख आहे बाळ? असा रडतोस कां?" सांगावें कीं सांगूं नये ह्याचा एकदम निश्चय

"तुला कोणतं दुःख आहे बाळ?"



न झाल्यामुळें बंडू घुटमळूं लागला. पण साधुबुवांनीं धीर देऊन पुन्हा प्रेमानें विचारल्यामुळें त्यानें आपली सर्व हकीकत सांगून टाकली. साधुबुवांना त्याची दया आली. त्यांनीं आपल्या लांब कफनीच्या खिशांतून एक जस्ताची डबी काढली व ती बंडूच्या हातीं देऊन म्हटलें, "बेटा, मी अंगाला राख फासून बसलेला वैरागी! तुझ्या संकटांत तुला काय मदत करणार? पण ही माझी तपकिरीची डबी तुझ्याजवळ असूं दे. तुझ्यावर कांहीं विकट प्रसंग आला व सुचेनासं झालं तर हिच्यांतील चिमूटभर तपकीर तुझ्या उपयोगी पडेल. भगवान् शंकरजीच्या कृपेनें तुझं भलं होईल!" बंडूला अंमळ बरें वाटलें. त्यानें ती तपकिरीची डबी घेतली व आपल्या चड्डीच्या खिशांत काळजीपूर्वक ठेवून दिली. थोड्या वेळानें त्यानें बुवांचा निरोप घेतला आणि गांवाच्या उत्तरेकडे एक मोठें जंगल होतें, त्यांतून गेलेल्या पाऊलवाटेनें तो चालूं लागला. अशा रीतीनें बंडूच्या धाडशी प्रवासास सुरुवात झाली.

## २

## पांचावर धारण

महादेवाच्या देवळापासून बंडू लगेच निघाला. त्या वेळीं नुकताच सूर्य उगवला होता. त्याचीं कोवळीं किरणें सर्वदूर पसरलीं होतीं. थंड व उत्साहवर्धक वारा वाहात असल्यामुळें बंडूचीं पावलें झपाझप पडत होतीं. तो जसजसा पुढें गेला तसतसें जंगल अधिकाधिक दाट होत गेलें. सुमारें चार पांच तास तो एकसारखा चालत होता. नंतर मात्र त्याला थकल्यासारखें वाटूं लागलें. भुकेमुळें पोटांतही कावळे कोकलूं लागले. पायांना विश्रांति देण्यासाठीं तो एका मोठ्या झाडाच्या बुंध्याखालीं बसला व

भुकेची व्यवस्था कशी करायची ह्याचा विचार करूं लागला. जंगलांतील झाडांचीं फळें गोळा करावींत, निदान चिंचेचा कोवळा पाला दगडानें ठेचून खावा, असें त्यास वाटूं लागलें. जर आपणास खाण्यासाठीं कांहींच मिळवतां आलें नाहीं, तर कसें होणार, ह्या भीतीनें तो कांहींसा भांबावून गेला. इतक्यांत जवळच असलेल्या एका दाट झुडुपांतून खसखस असा आवाज झालेला त्यानें ऐकला. साहजिकच त्याचें त्या बाजूला लक्ष गेलें. पाहातो तों एक काळ्या केसांचें भलें मोठें भयंकर अस्वल आपल्या दिशेनें येत आहे, असें त्यास दिसलें !

बंडूची पांचावर धारण बसली. अस्वलांच्या अनेक गोष्टी त्यानें वाचल्या होत्या, ऐकल्या होत्या, त्या सर्वांचा चित्रपट झर्रकन् त्याच्या नजरेसमोरून गेला. अस्वल गुदगुल्या करून माणसास ठार मारतें, असेंही त्यानें ऐकलें होतें. अस्वलाच्या तावडींतून युक्तीनें सुटका करून घेतल्याच्या गोष्टीही त्याला आठवल्या. झटकन् झाडावर चढून अस्वलास पाठलाग करूं द्यावा व फांदीच्या दुसऱ्या टोकाकडून जमिनीवर उडी मारून, त्यानें गांठण्यापूर्वी पळून जावें, अशी कल्पना आपोआप त्याच्या डोक्यांत आली. पण जवळपास सोईचें झाडच दिसेना. अस्वल मेलेल्या माणसाच्या वाटेस जात नाहीं, असें त्यानें कोठेंसें ऐकलें होतें, तें त्यास आठवलें. दुसरा उपायच नव्हता. म्हणून त्यानें जमिनीवर पालथें मेल्यासारखें पडून राहाण्याचें ठरविलें. त्यानें मनांत महादेवाची प्रार्थना केली व शक्य तेवढी हालचाल बंद करून तो जमिनीवर चुपचाप पालथा पडून राहिला.

अस्वल बंडूच्या अगदीं जवळ आलें व त्यानें पूर्वी कधींही न पाहिलेल्या ह्या प्राण्याची म्हणजे बंडूची कसून तपासणी करण्यास सुरुवात केली. बंडू खूपच घाबरून गेला. पण जोरानें श्वासोच्छ्वास करण्याचीसुद्धा सोय नव्हती. त्याच्या कानांत अस्वलानें एक फुंकर घातली व पाठीवर पंजाचा एक नाजूक तडाखाही मारला. त्यानंतर अस्वलराजाचें लक्ष बंडूच्या चड्डीकडे गेलें. चड्डीच्या खिशांत साधुबुवांनीं

दिलेली तपकिरीची डबी असल्यामुळें खिशाचा तो भाग थोडासा वर आला होता. त्या भागाला अस्वलाच्या नाकाचा बाहेरून स्पर्श झाला. तेव्हां आंतील चमत्कारिक वस्तु काय असावी हें समजून घेण्याची त्या रानटी पशूला विशेष उत्सुकता वाटली. त्यानें आपल्या लांब नखांनीं एका तडाक्यासरशीं तो खिसा फाडून टाकला, तेव्हां डबी बाहेर पडली. तिच्या बाहेरच्या बाजूस कांहीं तपकिरीचे कण चिकटले होते. अस्वलानें डबी हुंगली, तेव्हां ते तपकिरीचे कण त्याच्या नाकांत शिरतांच चमत्कारिक गुदगुल्या होऊन त्याला सटासट शिंका येऊं लागल्या. त्याचबरोबर दुसरा एक चमत्कार असा झाला, कीं अस्वलाच्या प्रत्येक शिंकेबरोबर एकेक पाणीदार टप्पोरें मोतीं त्याच्या नाकाबाहेर पडूं लागलें! हा काय अजब प्रकार आहे हें त्याला मुळींच कळेना व तें अगदीं घाबरून गेलें. त्याला सारख्या शिंकांवर शिंका येऊं लागल्या आणि त्याच्या नाकांतून मोत्यांवर मोतीं बाहेर पडूं

त्याच्या नाकांतून मोत्यांवर मोतीं बाहेर पडूं लागलीं.



लागलीं. त्यानें स्वत:भोवतीं अनेक गिरक्या घेतल्या व तें पिसाळल्यागत पळत सुटलें. जवळपास बंडू पडला आहे ह्याचा त्याला जणूं विसरच पडला. अस्वल चमत्कारिक आवाज करीत करीत तेथून दूर निघून गेल्यावर बंडू जागेवरून उठला. जिवावरचें संकट टळल्याबद्दल त्यानें महादेवाला मनापासून भक्तिभावानें नमस्कार केला. तपकिरीची डबी उचलून दुसऱ्या न फाटलेल्या खिशांत ठेवून दिली व अस्वलाच्या नाकांतून पडलेलीं मोतीं भराभर गोळा करून, अस्वल गेलें त्याच्या उलट दिशेनें तो धूम पळत सुटला. आपल्याला भूक लागली होती ह्या गोष्टीचाही त्याला विसर पडला.

## २

## राजवाड्यांत चोरी

बंडू जंगलाबाहेर पडला, तेव्हां संध्याकाळ झाली होती. सकाळपासून बंडूच्या पोटांत अन्नाचा एक कणही गेला नव्हता. अस्वलाच्या तावडींतून त्याची आश्चर्यकारक रीतीनें सुटका झाल्यामुळें त्याला आनंद झाला असला, तरी त्याचें शरीर अतिशय शिणून गेलें होतें. जंगलाच्या पलीकडे नदीकांठावर एक सुंदर शहर होतें. तेथपर्यंत जाऊन, कांहीं खायला मिळाल्यास तें खाऊन, एखाद्या देवळांत किंवा धर्मशाळेंत रात्रभर स्वस्थ झोप घ्यावी, सकाळीं पुढचें पाहातां येईल, असा त्यानें बेत केला.

त्या शहराचें नांव मोतीनगर. तें मोत्यांच्या व्यापारासाठीं अतिशय प्रसिद्ध होतें. मोत्यांसारख्या मूल्यवान् वस्तूंची मोठ्या प्रमाणावर देवघेव होत असल्यामुळें, तें शहर संपत्तीचें जणूं माहेरघरच बनलें होतें. मोठमोठ्या जवाहिऱ्यांच्या उंच उंच हवेल्या दिव्यांच्या रोषणाईनें शोभिवंत दिसत होत्या. पण बंडूला प्रथम पोटाची सोय लावायची

असल्यामुळें तो हलवायांच्या पेठेंत शिरला. दुतर्फा दुकानांतून काचेच्या कपाटांत नाना प्रकारची मेवामिठाई आकर्षक रीतीनें मांडून ठेवली होती. ती पाहून कोणाच्याही तोंडाला पाणी सुटलें असतें. मग बंडू तर काय सकाळपासून उपाशी आणि वर चालून चालून नि पळून पळून दमलेला होता. त्याच्या पोटांत जणूं बकासुरच उठला होता. मिठाई विकत घेण्यास त्याच्यापाशीं पैसे नव्हते, पण अस्वलाच्या नाकांतून पडलेलीं मोतीं होतीं. त्यांपैकीं एक मोतीं हलवायास देऊन मिठाई विकत घेण्यासाठीं तो एका दुकानांत शिरला.

बंडूनें दिलेलें तें मोठें व पाणीदार मोतीं पाहून दुकानदाराचे डोळे फिरण्याची वेळ आली. मोतीनगर मोत्यांची व्यापारपेठ होती, तरी पण इतकें मोठें व तेजस्वी मोतीं त्यानें जन्मांत पाहिलेलें नव्हतें. त्यामुळें त्या मोत्याच्या बदल्यांत हवी ती व हवी तेवढी मिठाई बंडूस देण्याचें त्यानें एकदम कबूल केलें. दुकानांतल्याच एका कोपऱ्यांतील बाकावर बंडूनें बैठक मारली आणि समोर टेवलेल्या स्वादिष्ट मिठाईवर मनसोक्त

**स्वादिष्ट मिठाईवर मनसोक्त ताव मारण्यास सुरुवात केली.**



ताव मारण्यास सुरुवात केली. काकूकडे रोज शिळेपाके तुकडे मोडणाऱ्या बंडूला इतकी रुचकर मिठाई स्वप्नांतदेखील चाखायला मिळाली नव्हती. सपाटून भूक लागलेली असल्यामुळें तर त्याला ती मिठाई अधिकच चविष्ट वाटूं लागली आणि ती खातां खातां मधूनमधून तो मोठमोठ्यानें मिटक्याही मारूं लागला.

इकडे बंडू खुषींत येऊन यथेच्छ पोटपूजा करीत होता तर तिकडे बैठकीवर बसलेल्या हलवायाच्या पोटांत मळमळ सुरू झाली होती. इतके भिकार कपडे घातलेल्या ह्या पोराकडे इतकें किंमती मोतीं कसें आलें, ह्याबद्दल त्याच्या मनांत शंकाकुशंका व तर्ककुतर्क चालू झाले होते. ह्या पोरानें हें मोतीं राजवाड्यांतून चोरून आणलें असावें, असा संशय त्याच्या मनानें पक्का घेतला.

मोतीनगरच्या राजवाड्यांत नुकतीच एक मोठी चोरी झाली होती. राजकन्या रत्नावलीच्या गळ्यांतला एक दुर्मिळ मोत्यांचा कंठा रत्नभांडारांतून एकाएकीं नाहींसा झाला होता. राजकन्येला तो कंठा अतिशय आवडत असे. तो नाहींसा झालेल्या कळल्यावर दोन दिवस तिनें अन्नपाणीसुद्धा घेतलें नव्हतें. रडून रडून तिचे डोळे सुजून गेले होते. काय वाटेल तें करा, पण कंठा शोधून आणा, असा कडक हुकूम राजानें प्रधानास दिला होता. प्रधानानें कोतवालास निकड लावली होती व जो कंठा शोधून काढण्यास अप्रत्यक्ष मदत करील किंवा प्रत्यक्ष तो आणून हजर करील, त्यास मोठें बक्षीस जाहीर केलें होतें. पण अजून कंठ्याचा कांहींच थांगपत्ता लागला नव्हता.

बंडूला गोत्यांत आणून, प्रधानानें जाहीर केलेलें मोठें बक्षीस आपणच गिळंकृत करावें अशी लालसा हलवायाच्या मनांत उत्पन्न झाली. खाणेंपिणें उरकल्यावर बंडू कोठें-कोठें गेला ह्यावर त्यानें गुप्त पाळत ठेवली. आपण कोणत्या चक्रव्यूहांत सापडत आहोंत ह्याची थोडीदेखील कल्पना नसल्यामुळें, रात्रभर झोप घेऊन थकवा घालवावा अशा विचारानें, बंडूनें नदी-किनाऱ्यावरील घाटावरचें एक देऊळ गांठलें आणि

तेथें सभामंडपांत एका बाजूला खुशाल ताणून दिली. इकडे हलवायानें लगबगीनें जाऊन प्रधानास बातमी दिली व पुरावा म्हणून बंडूनें त्याला मिठाईची किंमत म्हणून दिलेलें तें मोतींही दाखविलें. प्रधानानें तें मोतीं पाहिलें. तें अगदीं हुबेहूब राजकन्येच्या कंठ्यांतील मोत्याप्रमाणें असलेलें पाहून त्याला फार आनंद झाला. त्यानें हलवायाचे मनापासून आभार मानले व योग्य वेळीं त्याला जाहीर केलेलें बक्षीस देण्याचें कबूल केलें. त्यानंतर त्यानें शिपायांस बोलावून घाटावरील देवळांत निजलेल्या त्या मुलाच्या म्हणजेच बंडूच्या हालचालींवर सक्त नजर ठेवून त्याला सकाळींच आपल्यासमोर हजर करण्यास फर्माविलें. हुकुमाप्रमाणें शिपाई देवळाकडे रवाना झाले.

## ४

## कैदेंतून सुटका

दिवसभराचे श्रम, एका भयंकर संकटांतून सुटका व रात्रींचा मनसोक्त फराळ ह्यांमुळें बंडूस झकास झोप लागली. पहाटेच्या वेळेस अर्धवट स्वप्नांत त्याला तें अस्वल पुन्हा एकदा भेटलें हें खरें, पण सकाळीं उठला तेव्हां तो अगदीं ताजातवाना झाला होता. उगीच तोंडाचा चाळा म्हणून 'कोण दिवस येइ कसा, कोण जाणतो!' हें गाणें तो गुणगुणूं लागला. इतक्यांत राजाचा शिपाई दत्त म्हणून त्याच्या समोर उभा राहिला आणि त्यानें आपल्या बरोबर प्रधानाच्या वाड्याकडे चलण्यास त्याला दरडावून सांगितलें. हें काय नवें बालंट उत्पन्न झालें, हें बंडूस कळेना. तो खूपच घाबरला. आपण कोणाचा कांहींच अपराध केला नाहीं, वगैरे सांगून त्यानें त्याचीं पुष्कळ आर्जवें करून पाहिलीं, पण शिपायावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं आणि बंडूला शिपाया-बरोबर मुकाट्यानें जाणें भाग पडलें.

प्रधानाच्या वाड्यांत गेल्यानंतर त्यानें आरोपी बंडूची झडती घेण्यास शिपायांस सांगितलें. तेव्हां त्याच्या खिशांत अस्वलाच्या नाकांतून पडल्यानंतर त्यानें वेचलेलीं तीं मोतीं सापडलीं. झालें! मुद्देमाल सापडल्यामुळें बंडूवर गुन्हा शाबीत झाला. आपल्याला हीं मोतीं कशीं सापडलीं, ह्याची खरी हकीकत बंडूनें परोपरीनें प्रधानाला आर्जवून सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या बोलण्यावर कोणाचाच विश्वास बसेना. सर्वांनीं त्याला लबाड, थापेबाज व चोर ठरविलें. त्याच्याशीं जास्त वेळ बोलण्यास प्रधानास फुरसत नव्हती. त्यानें सर्व मोतीं आपल्या ताब्यांत घेतलीं आणि चोरीचा गुन्हा केल्याबद्दल त्याला तुरुंगांत डांबण्यास शिपायांना आज्ञा केली. शिपायांना त्याची सवयच होती. त्यांनी जाड दोरीनें बंडूच्या मुसक्या आवळल्या व त्याच्या खिन्न आणि भयभीत चेहऱ्याकडे दुर्लक्ष करून त्याला तुरुंगाच्या कोठडींत पोंचतें केलें.

त्याला तुरुंगांत डांबण्यास शिपायांना आज्ञा केली.



दुसऱ्या दिवसापासून बंडूच्या कैदेंतील आयुष्यास सुरुवात झाली. इतर कैदी जसे वागतात, तसेंच वागण्याचा तो प्रयत्न करूं लागला. ल्हानशी चूक झाली, तरी तेथील शिपायांच्या लाथा खाण्याचा प्रसंग येतो, हें त्याच्या लगेच लक्षांत आलें. राजकन्येच्या कंठ्याची चोरी करणारा कैदी, म्हणून त्याला इतरांपेक्षां जास्त छळलें पाहिजे, असेंही कांहीं शिपायांस वाटे. दिवसभर सक्त काम करावें लागत असल्यामुळें तुरुंगांतील जाडीभरडी भाकरीही त्याला गोड लागे. मधून मधून हलवायाच्या दुकानांत खाल्लेल्या स्वादिष्ट मिठाईची मात्र त्याला आठवण होई. आपण तुरुंगांत आहोंत हें काकाकाकूंस समजलें तर काय होईल, ह्या विचारानें त्याच्या छातींत धस्स होई व तो अतिशय बेचैन होऊन जाई. अशा रीतीनें दिवसांमागून दिवस जाऊं लागले. ह्या तुरुंगांतून आपली सुटका होणार तरी कधीं, ह्याची वाट पाहात बंडू खिन्न मनानें काळ कंठूं लागला.

इकडे प्रधान तीं मोतीं घेऊन राजवाड्यांत गेला आणि त्यानें तीं राजास व राजकन्येस दाखविलीं. हींच आपल्या हरवलेल्या कंठ्यांतील मोतीं, असें राजकन्येनें तत्काळ ओळखलें व तिला फार आनंद झाला. राजदरबारांतील कुशल कारागिराच्या हातीं तीं मोतीं देण्यांत आलीं व त्यांचा पूर्वीसारखाच कंठा बनवून देण्यास राजानें सांगितलें. सुमारें महिनाभर मेहनत करून कारागिरानें सुबक कंठा बनविला आणि मोठ्या अभिमानानें तो राजकन्येस आणून दिला. कंठा पाहून प्रथम राजकन्या प्रसन्न झाली. तिनें तो आवडीनें गळ्यांत घालूनही पाहिला. पण त्याची लांबी थोडीशी कमी झाल्याचें तिच्या लक्षांत आलें. लांबी कमी होण्याचें कारण पूर्वीपेक्षां त्यांत तीन मोत्यें कमीच होतीं. दागिन्यांच्या व कपड्यांच्या बाबतींत बायकांचें कोठें बिनसेल, ह्याचा नेम नसतो! राजकन्या अस्वस्थ झाली व उरलेलीं तीन मोतींही मिळवून आणा, असा तिनें राजापाशीं हट्ट धरला.

हीं तीन मोतींही बंडूनेंच कोठेंतरी लपवून ठेवलीं असतील, असा प्रधानानें तर्क केला व शिपायांकरवीं त्याला आपल्यासमोर हजर करून, त्याला दम देण्यास सुरुवात केली. "बऱ्या बोलानें आणखी तीन मोतीं कुठें लपवलीं आहेस तें सांगून टाक, नाहींतर बेदम मार खाशील!" असें त्यानें बंडूस धमकावलें. बिचारा बंडू हवालदिल झाला. आपल्यापाशीं आतां एकही मोतीं उरलें नाहीं, असें त्यानें जीव तोडून सांगितलें. तरी प्रधान तें मानीना. शिपाई जेव्हां चाबूक घेऊन मारायला उठले, तेव्हां कशीबशी सुटका करून घेण्यासाठीं मागचा पुढचा फारसा विचार न करतां "मीं तीं मोतीं हलवायाच्या नाकांत ठेवलीं आहेत. म्हणाल तर आत्तां आणून देतों!" असें त्यानें ठोकून दिलें.

प्रधानानें त्याला हलवायाच्या घरीं जाऊं न देतां हलवायालाच शिपाई पाठवून बोलावून आणलें. आतां बंडूच्या परीक्षेची वेळ आली. हलवायाच्या नाकांतून मोतीं निघालीं नाहींत, तर त्याची पाठ चांगलीच मऊ होणार, हें ठरून गेलें होतें. पण बंडूचा महादेवावर आणि साधुबुवांनीं दिलेल्या तपकिरीच्या डबीवर विश्वास होता. त्यांनींच जंगलांत भेटलेल्या अस्वलापासून त्याचें रक्षण केलें होतें व त्यामुळेंच ह्याही संकटांतून आपण निभावून जाऊं, अशी त्याला आशा होती. तुरुंगांतील सर्व शिपायांची नजर चुकवून त्यानें ती डबी आपल्याजवळ बाळगली होती. त्यानें शिपायांस हलवायाचे हात घट्ट पकडून ठेवण्यास सांगितलें व कोणाच्याही लक्षांत येऊं न देतां डबींतील चिमूटभर तपकीर त्याच्या नाकांत कोंबली. त्याबरोबर हलवायास लागोपाठ तीन जोराच्या शिंका आल्या व प्रत्येक शिंकेबरोबर एक, अशीं तीन मोठीं टप्पोरीं मोतीं त्याच्या नाकांतून सटकन् बाहेर पडलीं! प्रधान, शिपाई, राजवाड्यांतील इतर नोकरचाकर व स्वतः हलवाई ह्या सर्वांसच अतिशय नवल वाटलें. बंडूला मात्र त्या जंगलांतील अस्वलाची, त्याच्या गिरक्यांची, शिंकांची व नाकांतून बाहेर पडलेल्या मोत्यांची आठवण झाली. मोतीं मिळालीं म्हणून प्रधान अगदीं खूष झाला आणि ह्या पोरट्यानें



तीन टप्पोरीं मोतीं सटकन् बाहेर पडलीं.


विलक्षण रीतीनें मोतीं मिळवून दिलीं, म्हणून त्यानें त्याला मुक्त केलें आणि हलवायानें चोरीचा माल बेमालूम ठिकाणीं लपवून ठेवला, ह्या गुन्ह्याबद्दल त्याला बंडूची उरलेली शिक्षा भोगण्यास तुरुंगांत पाठवून दिलें. अशा रीतीनें बंडूस गोत्यांत आणणाऱ्या त्या दुष्ट हलवायाला त्याच्या कामगिरीबद्दल खासें बक्षीस मिळालें. इतकें झाल्यावर तीं तीन मोतीं घेऊन प्रधान राजवाड्याकडे लगबगीनें चालता झाला.

मराठी ग्रंथ [illegible] वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ दि ........
क्रमांक ........ नोंद दि ........

## ५
## पालखींतून जा

मोतीं स्वतः दाखवून राजाला आणि राजकन्येला खूष करावें, ह्यासाठीं प्रधान उतावीळ झाला होता. मोठी घाईगडबड करून तो राजवाड्यांत येऊन पोंचला. पाहातो तों तेथें एक नवीनच भानगड उपस्थित झालेली होती. दरबारी कारागिरानें बनविलेला तो कंठा गळ्यांत घालून राजकन्या आदल्या रात्रीं पलंगावर पडली असतां झोप लागून घोरूं लागली. इतक्यांत तो कंठा एकाएकीं तुटला व त्यांतील एकेक मोतीं तिच्या प्रत्येक श्वासाबरोबर एकामागून एक नाकांत घुसूं लागलें. नाकांतून आंत गेलेलें मोतीं डोक्यांत कोठेंतरी गडप होई. राजकन्या गाढ झोपेंत असल्यामुळें तिला हा प्रकार मुळींच कळला नाहीं. पण शेवटचीं एक-दोन मोतीं तिच्या नाकांत घुसतांना तिच्या एका दासीला दिसलीं. हा विपरीत प्रकार

**एक-दोन मोतीं तिच्या नाकांत घुसतांना दासीला दिसलीं.**



पाहून ती घाबरली. कंठा चोरल्याचा आळ आपल्यावर येईल व मग आपल्या मागें साडेसाती लागेल, अशी तिला भीति वाटली. तिनें मोठ्यानें आरडाओरड केली. तेव्हां आसपासचे दुसरे नोकर व दासी धावून आल्यामुळें तेथें एकच गर्दी झाली. दासीनें घाबऱ्या घाबऱ्या त्या सगळ्यांना तो अजब प्रकार सांगितला. ह्या गलक्यामुळें राजकन्या जागी झाली. पण अंथरुणावरही उठून बसतां येईना, इतकें तिचें डोकें जड झालें होतें. त्या अजब मोत्यांनीं राजकन्येच्या डोक्यांतच ठाण मांडल्यामुळें तिच्या डोक्यांत अगदीं असह्य असा ठणका सुरू झाला होता व त्या वेदनांमुळें ती मोठ्यानें विव्हळूं लागली.

राजाला बोलावणें गेलें. तो लगेच आला व राजकन्येच्या उशाशीं बसून राहिला. राजवैद्यास बोलावून आणलें पण असलें विचित्र दुखणें त्यानें आजपर्यंत ऐकलेंसुद्धा नसल्यामुळें त्याची मात्रा बिलकुल चालेना. काय करावें हें कोणासच सुचेना. इतक्यांत प्रधान राजवाड्यांत आला. पाहातो तों राजकन्या कण्हत पडलेली व राजा तिच्या उशाशीं सचिन्त बसलेला. त्यानें भीतभीतच राजाला उरलेलीं तीन मोतीं मिळाल्याचें व तीं आपण आणलीं असल्याचें सांगितलें. एकही मोतीं मिळालें नसतें, तर हें संकट उभेंच राहिलें नसतें. जर हीं तीन मोतीं पूर्वीच मिळालीं असतीं, तर तींसुद्धा भर घालायला राजकन्येच्या डोक्यांत जाऊन बसलीं असतीं. अशी स्थिति असल्यामुळें राजाला काडीमात्र आनंद झाला नाहीं. राजकन्या तर विचारी आपल्याच दुःखांत चूर होऊन गेली होती. ह्यामुळें प्रधानही आपला आनंद विसरून, काय करावें ह्याचा विचार करूं लागला. ज्या कैदी पोरट्यानें म्हणजे आपल्या बंडूनें हलवायाच्या नाकांतून मोतीं काढून दाखविलीं, तो ह्या वेळीं खात्रीनें उपयोगीं पडला असता, असें त्याच्या मनांत आलें. पण त्याची तर तो नुकतीच मुक्तता करून आला होता. त्याचा पुन्हा शोध करण्याचें त्यानें ठरविलें.

सर्व राजवाड्यावर दुःखाची अवकळा पसरली होती. राजकन्या रत्नावलि ही राजाची एकुलती एक लाडकी लेक होती. दागिन्यांचा


हव्यास सोडला, तर ती स्वभावानें अतिशय चांगली मुलगी होती. तिच्या स्वभावांतील प्रेमळपणा व उदारपणा आणि बोलण्या-वागण्यांतील गोडपणा ह्यांमुळें ती राजवाड्यांतील प्रत्येक माणसाला हवीहवीशी वाटे. राजा तर तिला अगदीं जीव कीं प्राण समजे. अशा ह्या लाडक्या राजकन्येवर हें चमत्कारिक आजाराचें संकट ओढवल्यामुळें सर्वजण फारच दुःखीकष्टी झाले. राजधानींतलेच नव्हे, तर अवघ्या राज्यांतले झाडून सारे वैद्य व हकीम राजवाड्यांत दाखल झाले, पण कोणाचाही उपाय चालेना. राजकन्येला भूतबाधा झाली असेल, अशी कोणींतरी शंका काढली, म्हणून मांत्रिक बोलावण्यांत आले, पण त्यांचीही डाळ शिजेना. राजकन्येच्या डोक्यांतील ठणका व जडपणा कांहीं केल्या किंचित्‌ही कमी होईना. ही सुरेख व गोड मुलगी अशी बघतां बघतां हातची जाणार कीं काय, ह्या काळजीमुळें सर्वत्र उदासपणाची गडद छाया पसरली.

राजकन्येला जो बरी करील, त्याला मोतीनगरचें अर्धें राज्य मिळेल असें राजानें जाहीर केलें. ज्या ज्या ठिकाणीं नामांकित वैद्य, हकीम किंवा मांत्रिक आहेत, असें राजाला समजलें, त्या त्या ठिकाणीं राजदूत पाठविण्यांत आले. जंगलापलीकडच्या बंडूच्या गांवाजवळ एक महादेवाचें देऊळ आहे, त्यांत राहाणारा साधुबुवा मोठा देवभक्त व सिद्ध पुरुष आहे, तो राजकन्येचा प्राण वांचवूं शकेल, असें कोणींतरी राजास सांगितलें. त्यानें तावडतोब एक पालखी व कांहीं दूत साधुबुवांकडे रवाना केले. दूत शक्य तितक्या त्वरेनें साधुबुवांकडे येऊन पोंचले. साधुबुवा नेहमींप्रमाणें धुनीजवळ चिलीम ओढीत बसले होते, त्यांना दूतांनीं त्या अजब मोत्यांची व राजकन्येच्या चममत्कारिक दुखण्याची सर्व हकीकत सांगितली व आपल्याबरोबर पालखींतून मोतीनगरला चलण्याची विनंती केली. ह्यावरून अंतर्ज्ञानानें जें काय समजायचें तें साधुबुवा समजले. त्यांनीं स्वतः पालखींतून चलण्याचें नाकारलें, पण मोतीनगरच्या नदीपलीकडे जंगलांत एक मुलगा राहूं लागला आहे, त्याला पालखींत बसवून मोतीनगरला घेऊन जाण्यास सांगितलें. “ भगवान शंकरजीच्या

कृपेनें सर्व कांहीं ठीक होईल," असा आशीर्वादही त्यांनीं दिला. दूत आल्या पावलीं परत निघाले.

राजदूत निघून गेल्यावर कांहीं वेळानें साधुबुवांनीं एका मोठ्या पिंपळपानावर 'पालखींतून जा. शंकरजी तुझं भलं करील.' असा मजकूर नखानें लिहिला. देवळांत कांहीं कबुतरें घुमत होतीं. त्यांपैकीं एकाला साधुबुवांनीं जवळ बोलावलें. एखादा आज्ञाधारक मुलगा बापाजवळ जातो, तसें तें कबूतर बुवांच्या जवळ गेलें. त्यांनीं त्या कबुतराच्या चोंचींत तें पिंपळपान दिलें व म्हटलें, "बेटा, एवढी चिट्ठी तो मुलगा असेल तिथें पोंचवून ये बरं!" साधुबुवांचें बोलणें जणूं कांहीं आपल्याला समजलें, अशी त्या कबुतरानें मान हालविली व पंखांची फडफड करीत तें भुर्कन् उडून गेलें.

त्या कबुतराच्या चोंचींत तें पिंपळपान दिलें.




## ६

## कल्पवृक्षाची कृपा

प्रधानाच्या हुकुमाप्रमाणें शिपायांनीं हलवायाची रवानगी तुरुंगाकडे केली व बंडूस सोडून दिलें. त्याबरोबर बंडू जो धूम पळत सुटला, तो नदीच्या कांठीं आला, तेव्हांच थांबला. पुन्हा शिपाई येतील व आपल्याला पकडून नेतील अशी त्याला अजूनही भीति वाटत होती. समोर नदींत त्याला एक लहानशी होडी दिसली. तिचा नावाडी जवळपास कोठेंच दिसत नव्हता. बंडू तडक त्या होडींत चढला. होडींत असलेल्या वांबूच्या साहाय्यानें तो पैलतीरावर सुरक्षितपणें पोंचला, तेव्हांच त्याला आपण आतां निश्चिन्त झालों असें वाटलें.

ह्या एकान्त ठिकाणीं पोटासाठीं काय करावें, ही एकच चिंता बंडूला होती. माणसें अस्वलापेक्षांही वाईट असतात, असा कटु अनुभव त्याला आला असल्यामुळें अन्न मिळविण्यासाठींसुद्धा गांवांत जायचें नाहीं, असा त्यानें निश्चयच केला होता. कडकडून भूक लागली होती, पण खायचें काय ? त्याला साधुबुवांनीं दिलेल्या तपकिरीच्या डबीची आठवण झाली, पण अस्वलाच्या आणि हलवायाच्या नाकांतून पडलीं तशीं मोतीं आपल्याही नाकांतून पडलीं, तरी तीं थोडींच खातां येणार आहेत ? तो पुन्हा निराश झाला. पण ‘ संकटाच्या वेळीं ही डबी कामीं येईल, ’ असें साधुबुवा म्हणाले होते, तें त्याला आठवलें. त्यानें हात जोडून नम्रपणें महादेवाला नमस्कार केला आणि डबींतली किंचित्शी तपकीर चिमटींत धरून हुंगली. त्याला फक्त एकच जोराची शिंक आली व शिंकेबरोबर नाकांतून मोतीं न पडतां लिंबाच्या बीसारखी एक बी फटकन् बाहेर पडली. बंडूनें लगेच जमीन किंचित् उकरून ती बी पेरून टाकली. मग नदींतील ओंजळभर पाणी आणून त्या जागेवर शिंपडलें. तों काय



फांद्यांना सुंदर फळें व मेवामिठाईचीं पुडकीं लागलीं होतीं.

चमत्कार सांगावा! त्या ठिकाणावर एक रोपटें उगवलेलें त्याला दिसलें व पांच-सात मिनिटांत तें पुरुषभर उंच वाढलें. पण त्याच्या फांद्यांना पानां-फुलांच्या ऐवजीं निरनिराळ्या प्रकारचीं सुंदर फळें व मेवामिठाईचीं रंगीत कागदांत गुंडाळलेलीं पुडकीं लागलीं होतीं. बंडूला साहजिकच खूप आनंद झाला. स्वर्गातील नंदनवनांत कल्पवृक्ष नांवाचें एक झाड आहे म्हणतात. त्याच्या खालीं बसून आपण कांहींही मागितलें, तरी तें लगेच मिळतें, अशी समजूत आहे. ह्या आपल्या नवीन झाडाला 'कल्पवृक्ष' हेंच नांव देण्याचें बंडूनें ठरविलें. त्यानें त्या कल्पवृक्षावरचीं कांहीं फळें व मिठाईचीं दोन-तीन पुडकीं खालीं उतरविलीं आणि हातपाय स्वच्छ धुवून प्रसन्न मनानें यथास्थित फराळ केला. इतके स्वादिष्ट पदार्थ कित्येक महिन्यांनीं त्याला चाखायला मिळाले. रोज त्या झाडाला नवीं नवीं फळें व पुडकीं लागत असल्यामुळें बंडूला आतां दुसऱ्या कशाचीही गरज भासत नव्हती. त्याचे दिवस मोठ्या मजेंत जात होते. माणसाला

कोणतीही चिंता नसली आणि खायला-प्यायला भरपूर मिळालें, तर त्याची प्रकृति आपोआप सुधारते. तुरुंगांतील कष्ट व भिकार अन्न ह्यांमुळें वाळून निस्तेज झालेला बंडू कल्पवृक्षाच्या कृपेनें चांगलाच पुष्ट व सतेज दिसूं लागला.

एके दिवशीं संध्याकाळीं बंडू आपल्या वसाहतींत फेरफटका करीत असतां एक रिकामी पालखी व राजाचे कांहीं दूत मोतीनगराकडे जातांना त्याच्या दृष्टीस पडले. साधुबुवांस आणण्याकरितां गेलेला तो लवाजमा त्यांनींच सांगितलेला मुलगा शोधून काढण्यासाठीं त्या जंगलांतून जात होता. त्या दूतांपैकीं एकाचें लक्ष अचानकपणें बंडूकडे गेलें. तेव्हां सगळेच त्याच्याकडे निरखून पाहूं लागले. साधुबुवांनीं सांगितलेला मुलगा तो हाच असावा, असें त्या सर्वांस वाटलें. तेव्हां तें टोळकें बंडूच्या रोखानें निघालें. तें पाहून बंडू घाबरला. कारण राजदूतांची त्यानें आतां जबरदस्त धास्ती घेतली होती. निरपराधी लोकांना पकडून जबरदस्तीनें तुरुंगांत डांबण्यासाठींच राजेलोक शिपाई नेमीत असतात, अशी मागल्या अनुभवावरून त्याची पक्की खात्री झाली होती. त्यामुळें राजदूतांना चुकविण्याचा त्यानें शिकस्तीचा प्रयत्न चालविला. बराच वेळपर्यंत त्यांच्यांत लपंडाव चालू होता. पण इतक्या सरावलेल्या शिपायांच्या तडाख्यांतून निसटणें बंडूस जमेना. शेवटीं त्या सर्वांनीं त्याला घेरलेंच. "कसंही करून राजवाड्यापर्यंत चला, तुम्हांला कोणताही त्रास होणार नाहीं, ह्याची आम्ही हमी घेतों," अशी ते बंडूला आश्वासनपूर्वक विनंती करूं लागले. पण त्याला मोतीनगरची इतकी जबरदस्त दहशत बसली होती, कीं कांहीं केल्या तो त्यांच्याबरोबर जाण्यास तयार होईना.

त्या मंडळीची अशी मिनतवारी चालू असतां तेथें एक कबूतर उडत आलें व बंडूच्या खांद्यावर बसलें. त्याच्या चोंचींत एक पिंपळपान होतें. कबुतरानें तें पान बंडूच्या डोळ्यांसमोर धरण्याचा प्रयत्न एकसारखा चालविला होता. कबुतर असें कां करीत आहे, हें प्रथम बंडूला



कबूतर बंडूच्या खांद्यावर बसलें.

कळेना. पण लवकरच त्याच्या लक्षांत आलें, कीं हें आपल्याला कांहींतरी वाचायला सांगत आहे. मग त्यानें तें पिंपळपान हातांत घेऊन वाचलें. त्यावर 'पालखींतून जा. शंकरजी तुझं भलं करील.' असें लिहिलें होतें. पत्राच्या भाषेवरून व तें पोंचतें करण्यासाठीं केलेल्या चमत्कारावरून बंडूनें ओळखलें, कीं हा साधुबुवांचाच निरोप आहे. त्याची साधुबुवांवर अगोदरपासूनच असलेली श्रद्धा आतां साहजिकच अगदीं दृढ झाली होती. तेव्हां त्यानें पालखींतून जाण्याचें तत्काळ कबूल केलें. आपल्यावर सोपविलेली कामगिरी आतां पुरी झाली आहे, हें त्या कबुतरानें ओळखलें. त्यानें छाती फुगवून आनंद व्यक्त केला आणि तें जसें आलें, तसें निघून गेलें. इतका वेळ आपल्या विनवण्यांना न जुमानणाऱ्या बंडूला त्या कबुतरानें क्षणार्धांत कसें वठणीवर आणलें ह्याचें राजदूतांस आश्चर्य वाटलें. सूर्य मावळण्याच्या बेतांत होता. कदाचित बंडूची लहर फिरेल असें मनांत येऊन त्यांनीं थोडाही वेळ न गमावतां बंडूस पालखींत बसविलें आणि ते जलदीनें राजवाड्यांत येऊन पोंचले.

७

# शंकरजीची इच्छा

बंडूची सर्वत्र शोधाशोध होऊन तो राजवाड्यांत पोंचेपर्यंतच्या काळांत राजकन्येची अवस्था अत्यंत केविलवाणी झाली होती. 'डोक्यांतला ठणका थांबवूं शकत नसाल, तर विष देऊन मला मारून तरी टाका' असें ती ज्याला त्याला विनवीत होती. राजा, प्रधान व राजवाड्यांतली नोकरमंडळी सुतक्या-सारखे चेहरे करून बसली होती. अस्वलाच्या नाकांतील मोतीं शेवटीं राजकन्येच्या डोक्यांत जाऊन कशीं बसलीं, ही अद्भुत हकीकत सर्वांच्या बोलण्यावरून बंडूनें अंदाजानें ताडली. पूर्वीचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले होते. ह्या शेवटच्या प्रयत्नाला तरी यश मिळेल अशी राजाला आशा वाटत होती. राजकन्येच्या यातना पाहून बंडूला दया आली. त्यानें हात जोडून मनापासून महादेवाची प्रार्थना केली. साधुबुवांच्या शक्तीवरही त्याचा विश्वास होता. त्यानें आपल्या खिशांतल्या त्या डबींतली चिमूटभर तपकीर राजकन्येला हुंगायला दिली. तपकीर नाकांत जातांच राजकन्येला फटाफट शिंका येऊं लागल्या. प्रत्येक शिंकेबरोबर एकेक मोतीं तिच्या नाकांतून बाहेर पडूं लागलें आणि दरेक मोत्याबरोबर डोक्याचा ठणका व जडपणा कमीकमी होऊं लागला. शेवटचें मोतीं बाहेर पडतांच शिंका बंद झाल्या व राजकन्या खडखडीत बरी झाली!

राजाचा आनंद गगनांत मावेना. बंडूच्या उपकाराची फेड कशी करावी, हेंच त्याला कळेना. त्यानें राजेपण विसरून बंडूला लवून नमस्कार केला. त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. कांहीं वेळ त्याच्या तोंडांतून शब्दच फुटेना. मग त्यानें बंडूचे फार फार आभार मानले व जाहीर केल्याप्रमाणें आपलें अर्धें राज्य त्याला देऊं केलें. जादूप्रमाणें दुखणें नाहींसें झाल्यानें राजकन्येला तर पुनर्जन्म

झाल्यासारखेंच वाटलें आणि बंडू हा कोणी देवदूतच असावा, अशी तिची भावना झाली. पण बंडूनें ही सर्व कृपा महादेवाची व साधुबुवांची आहे, त्यांनाच धन्यवाद द्या, असें सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं सर्वांनीं साधुबुवांच्या दर्शनास जायचें ठरलें. राजवाड्यांत सर्वत्र आनंदीआनंद झाला होता. दिवाळी साजरी करावी तशी ती रात्र सर्वांनीं आनंदोत्सवांत घालविली.

दुसऱ्या दिवशीं भल्या पहाटेसच तीन पालख्या तयार ठेवण्यांत आल्या. त्यांत बसून राजा, राजकन्या व बंडू साधुबुवांच्या दर्शनास निघालीं, तीं दोन प्रहरांनंतर मुक्कामाला पोंचलीं. साधुबुवा नित्याप्रमाणें धुनीजवळ चिलीम ओढीत बसले होते. प्रथम त्या तिघांनीं देवळांतील महादेवास मनोभावें नमस्कार केला व नंतर साधुबुवांस नमस्कार करून तीं सर्व मंडळी त्यांच्या जवळ बसली. बंडूनें राजा व राजकन्या ह्यांची ओळख करून देऊन सर्व हकीकत सांगितली. बराच वेळपर्यंत सर्वांच्या त्याच गोष्टी चालल्या होत्या. साधुबुवाही प्रसन्न होते. बोलण्याच्या ओघांत ते राजाला म्हणाले, "राजा, राजकन्येचं ह्यां मुलाशीं लग्न व्हावं, अशी भगवान् शंकरजीची इच्छा दिसते!" आपल्याला प्रिय असलेला विषयच साधुबुवांनीं काढला, ह्याबद्दल राजाला व राजकन्येलाही आनंद झाला. लगेच राजानें भगवान् महादेवाला व साधुबुवांना साक्षी ठेवून राजकन्येचा बंडूशीं लवकरच विवाह होईल, असें जाहीर केलें. मग बंडू व राजकन्या ह्यांनी जोडीनें महादेवाला व साधुबुवांना नमस्कार केला. साधुबुवांनीं त्या उभयतांस मंगल आशीर्वाद दिला. सर्वांनीं त्या रात्रीं देवळांतच मुक्काम केला व दुसऱ्या दिवशीं साधुबुवांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन मोतीनगरास प्रयाण केलें.

राजज्योतिष्यांनीं लग्नासाठीं शुभ मुहूर्त काढला. लग्नसमारंभाची जंगी तयारी सुरू झाली. राजाच्या आनंदांत मोतीनगरची प्रजा स्वखुषीनें सामील झाली. मंडप, रोषणाई, वाजंत्रीं, नाचगाणीं, मानसन्मान, कपडेलत्ते, खाद्यपदार्थ, दारूसामान, मिरवणुका, वगैरेंत कांहीं म्हणतां

## गोष्टी लिहिण्याचा नि सांगण्याचा छंद ....

... धोपेश्वरकर मास्तरांना फारच. आणि त्या गोष्टी नटवून, सजवून छापून प्रकाशित करण्याचा आमचा छंद तर कांहीं विचारूंच नका. कारण तें तंत्र धोपेश्वरकर मास्तरांना फारसें अवगत नसलें, तरी आम्हांला चांगलेंच अवगत आहे. मोरेश्वरशास्त्री जोश्यांसारखे कित्येक शास्त्री म्हणजे आपले आवडते लेखक, चित्रकार, ब्लॉकमेकर, छापखानेवाले आमचे दोस्त आहेत. त्यामुळें तीं कामें अगदीं शास्त्रोक्त उरकलीं जातात.

## गोष्टी प्रकाशित करण्याचा छंद

ही यादीच सांगेल ...

बेबी कोंकरूं
गाय आणि कावळा
बाळ आणि बदकें
वाजा विहिरींत पडला
मी कोण ?
पाजव्याचा पराक्रम
निमीचे मित्र
तीन पढत मूर्ख
अद्भुत कथा १-२-३
कथामोहिनी १-२
जगांतील शिशुकथा १-२-३
इटुकल्या मिटुकल्या गोष्टी
हजरजबाबी बिरबल १-२-३
विवेकानंदांची गोष्ट
रामकृष्ण परमहंसांची गोष्ट
कथा ही नगरींची दोन
तारल बुलबा

आणखी खूप आहेत. संपूर्ण यादीच मागवा.